॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२३ ( प्रतिनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा, अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रातर्फे आयोजित मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त 'साहित्यकृतीचे माध्यमांतर' या विषयावर समूहचर्चा झाली.

प्रशाळेचे संचालक प्रा. म.सु.पगारे हे अध्यक्षस्थानी होते. या समूह चर्चेत डॉ. दीपक खरात, कृष्णा संदानशिव, हेमराज पाटील तसेच विद्यार्थ्यांनी भाग घेवून साहित्यकृतींच्या आशयाला धक्का न लावता माध्यमांतर झाले पाहिजे असा सूर व्यक्त केला. तुंबाड, कोर्ट, पिंजरा, प्रहार, सैराट, जोगवा, सिंहासन अशा साहित्यकृतींचे चित्रपटांमध्ये झालेले माध्यमांतर यावर चर्चा झाली. प्रा. पगारे यांनी माध्यमांतर होत असतांना त्यातील अस्वस्थता निर्माण करणाऱ्या बिंदुमुळे माध्यमांतरे जागतात असे मत व्यक्त केले. भारती सोनवणे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून आभार मानले.

---

जा क्र. कबचौउमवि/१६/ बातमी/२०२५ दि २३ जानेवारी २०२५

प्रति

मा. संपादक

कृपया वरील बातमी प्रसिध्दीस देऊ सहकार्य करावे ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी